भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/2015-16/168
डीपीएसएस(सीओ)आरटीजीएस क्र. 492/04.04.002/2015-16 सप्टेंबर 1, 2015

आरटीजीएसमध्ये भाग घेणा-या बँकांचे अध्यक्ष/
व्यवस्थापकीय संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी

महोदय/महोदया ,

**आरटीजीएसच्या टाईम विंडोमधील बदल**

कृपया, भारतीय रिझर्व बँकेने, ऑगस्ट 28, 2015 रोजी दिलेल्या, 'सप्टेंबर 1, 2015 पासून दुस-या व चौथ्या शनिवारी बँकांची रजा :- कामकाजाच्या शनिवारीही आरबीआय तिच्या आधार-सेवा देणार' ह्यावरील, वृत्तपत्र निवेदन क्र. 2015-2016 /528 चा संदर्भ घ्यावा.

(2) त्यानुसार, दुस-या व चौथ्या शनिवारी, संपूर्ण दिवस, आरटीजीएस कार्यान्वित असणार नाही, परंतु कामकाजाच्या शनिवारी ती संपूर्ण दिवस कार्यान्वित असेल. दुस-या व चौथ्या शनिवारी मूल्याधिष्ठित तारीख असलेल्या भविष्यातील/भावी मूल्याधिष्ठित तारखेने व्यवहारांची प्रक्रिया आरटीजीएसखाली केली जाणार नाही.

(3) 1 सप्टेंबर, 2015 पासून जारी होणारी आरटीजीएस टाईम-विंडो खालीलप्रमाणे असेल.

| अनुक्रमांक | टाईम इव्हेंट | दुसरा व चौथा शनिवार सोडून शनिवारांसह नित्यनियमित दिवस |
|---|---|---|
| (1) | व्यवहारासाठी खुली | सकाळी 08.00 वाजता |
| (2) | सुरुवातीचा कट ऑफ (ग्राहकांचे व्यवहार) | दुपारी 4.30 |
| (3) | अंतिम कट ऑफ (आंतर बँकीय व्यवहार) | संध्याकाळी 7.45 |
| (4 | आयडीएल रिव्हर्सल | संध्याकाळी 7.45 ते 8.00. |
| (5) | दिवसाची समाप्ती | संध्याकाळी 8.00. |

(4) हे परिपत्रक, प्रदान व तडजोड प्रणाली अधिनियम, 2007 च्या, कलम 10(2) खाली देण्यात येत आहे.

(5) कृपया पोच द्यावी.

आपली

नीलिमा रामटेके
महाव्यवस्थापक

देय आणि सेटलमेंट प्रणाली विभाग, केंद्रीय कार्यालय, 14वा मजला, केंद्रीय कार्यालय भवन,शहीद भगत सिंग रोड, फोर्ट, मुंबई - 400001 फोन : (91-22) 2264 4995; फॅक्स : (91-22) 22691557; ई-मेल :cgmdpssco@rbi.org.in